# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः27.05.2025** **वारःमंगळवार**

1. मुंबई-पुण्यासह राज्यात सर्वत्र मुसळधार पाऊस; जनजीवन विस्कळीत,
2. राज्याच्या सर्वच भागात आजही जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा,
3. संपूर्ण प्रशासनाला सतर्कतेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश,
4. येत्या वर्षभरात देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन होईल-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची ग्वाही, आणि
5. बीड जिल्ह्यातील माजी आमदार आर. टी. देशमुख यांचं अपघाती निधन.

**पाऊस**

मुंबई पुण्यासह ठाणे, रायगड आणि सोलापूर जिल्ह्याला काल पावसानं अक्षरश: झोडपून काढलं. राज्याच्या सर्वच भागात काल पावसानं जोरदार हजेरी लावली. पुणे, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई आणि उपनगरात अतिवृष्टी झाली असून येत्या 2 दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर विदर्भात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. नैऋत्य मोसमी पावसानं 107 वर्षांचा विक्रम मोडत राज्यात वेळेआधीच प्रवेश केला आहे.

मुंबई आणि उपनगरात काल झालेल्या मुसळधार पावसानं शहरातलं जनजीवन विस्कळीत झालं. सखल भागांत, रेल्वेरुळांवर पाणी साचल्यानं उपनगरी रेल्वेसेवेवरही परिणाम झाला होता. विमानांची उड्डाणंही काल उशिरानं सुरू होती. शहरातल्या 96 धोकादायक इमारतींमधल्या तीन हजारापेक्षा जास्त लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

रायगडमध्ये वीज पडून एकाचा मृत्यू झाला आहे. अतिवृष्टीमुळे महाड ते रायगड किल्ला रस्ता बंद करण्यात आला आहे. रत्नागिरीच्या खेड तालुक्यात जगबुडी नदीची पाणीपातळी वाढली असून, खेड ते दापोली रस्ता फुरुसजवळ बंद असून, वाहतूक पालगडमार्गे वळवण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 59 गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात लाखो रुपयांचं मोठं नुकसान झालं आहे.

पुणे जिल्ह्यात दौंड, बारामती, आणि इंदापुरात मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक घरांमध्ये पुराचं पाणी शिरलं आहे; बारामतीत पुरात अडकलेल्या सात जणांना वाचवण्यात आलं असून 70 ते 80 कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. इंदापूरमध्येही पुरात अडकलेल्या 2 जणांना वाचवण्यात आलं आहे. दौंड आणि खेड तालुक्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे.

पुणे शहरातही काल पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. त्यामुळे अनेक रस्ते जलमय झाले होते. अनेक ठिकणी झाडं कोसळून पडली. कर्वेनगर भागातील अलंकार पोलिस चौकीजवळ झाड पडल्यानं एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे.

सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या अनेक भागात काल मुसळधार पाऊस झाला. नीरा आणि भीमा खोऱ्यात जोरदार पावसामुळे भीमा नदीला पूर आला आहे. माळशिरस तालुक्यातील कुरबावी गावातील पुराच्या पाण्यात अडकलेल्या 6 नागरिकांना एनडीआरएफच्या पथकानं सुरक्षित बाहेर काढलं. पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे इथल्या महादेवाच्या मंदिरात पूजेसाठी गेलेल्या एक साधू आणि दोन नागरिकांनाही पुरातून बाहेर काढण्यात आलं आहे. नदीकाठच्या लोकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सातारा जिल्ह्यात फलटणमध्येही जोरदार पावसाची नोंद झाली. दुधेबावी गावाजवळ अडकलेल्या 30 नागरिकांना एनडीआरएफच्या पथकानं वाचवलं आहे. सांगली जिल्ह्यात पावसामुळे कृष्णा नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून बहे, डिग्रज, सांगली आणि म्हैसाळ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यात वीज पडून दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर 6 जण गंभीर जखमी झाले आहेत. धाराशिव जिल्ह्यातही अनेक ठिकाणी काल मुसळधार पाऊस झाला; जिल्ह्यात अनेक ठिकाणी नदी नाले भरून वाहत आहेत. परभणी जिल्ह्यात पावसामुळे शेतपिकांचं आणि घरांचं मोठं नुकसान झालं आहे.

**मुख्यमंत्री**

दरम्यान, राज्यातल्या पावसाच्या स्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल आढावा घेतला. संपूर्ण प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. नुकसानग्रस्त भागात तत्काळ पंचनामे करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल बारामती तसंच निंबोडी, शेटफळगढे, मदनवाडी आणि भिगवण इथल्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव आणि मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावं, असे निर्देश अजित पवार यांनी दिले आहेत.

मुंबई आणि परिसरात पावसामुळे बाधित झालेल्यांच्या मदतीसाठी सर्व यंत्रणा सुसज्ज असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातल्या पाऊस बाधित क्षेत्राची पाहणी केल्यानंतर ते काल वार्ताहरांशी बोलत होते. मुंबईत सध्या नालेसफाई सुरू असून ती लवकरच पूर्ण होईल. सर्व विभागांशी समन्वय साधला जात असल्याचं ते म्हणाले. मुंबईत काही ठिकाणी दरड कोसळण्यासंदर्भात आपण सुरक्षा जाळ्या बांधण्याचे आदेश आयुक्तांना दिल्याचंही शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षालाही भेट दिली. नागरिकांची सुरक्षा सर्वात महत्त्वाची असून त्यासाठी सर्व यंत्रणा सतर्क असल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2014 मध्ये प्रथमच भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली; त्याला काल 11 वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त गुजरातमध्ये दाहोद इथं काल एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी सुमारे 24 हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण मोदी यांच्या हस्ते झालं. देशाच्या विकासासाठी आवश्यक सर्व गोष्टी देशातच तयार व्हाव्यात, ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**अमित शहा-नागपूर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून काल त्यांच्या हस्ते नागपूरजवळ जामठा इथल्या राष्ट्रीय कर्करोग संस्थेत स्वस्ती निवासचं भूमिपूजन झालं. राष्ट्रीय कर्करोग संस्था ही आगामी काळात देशातल्या प्रमुख कर्करोग उपचार संस्थापैकी एक असेल, असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. कामठी तालुक्यात चिचोली इथ उभारण्यात येणाऱ्या राष्ट्रीय न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठाच्या इमारतीचं भूमिपूजनही काल अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आलं.

**अमित शहा-नांदेड**

पुढच्या वर्षी 31 मार्चपर्यंत देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन केलं जाईल, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नांदेड इथ दिली. हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं उद्घाटन काल शहा यांच्या हस्ते झालं; त्यानंतर झालेल्या शंखनाद जाहीर सभेत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. भारत आपल्या सीमांच्या रक्षणासाठी कटिबद्ध आहे; ऑपरेशन सिंदूरद्वारे भारताने जगाला हाच स्पष्ट संदेश दिला आहे असं सांगून शहा म्हणाले.....

**सेंक्रो आतंगवादी हमारे हवाई हम्ले में तहैस नहैस हो गयें । और भाईयो और बेहनों, ओपरेशन सिंदूर ने हमेशा के लिए पूरी दुनिया न केवल पाकिस्तान पूरी दुनिया में एक संदेश बेजा है, कि भारत की सेना भारत की जनता और भारत की सीमा इसके साथ छेड़खानी नहीं करते, वर्ना नतीजे भुगतने पड़ते हैं, नतीजे भुगतने पड़ते हैं । और मोदीजीं ने स्पष्य कर दिया, के हमारे निर्दोश नागरीकोंपर अगर कोई हमला करता है, तो गोली का जवाब गोले से दिया जाएगा उसको माकूल जवाब दिया है ।**

मराठवाड्यातील दुष्काळ संपण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राबवलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पामुळे मराठवाड्याला आगामी पाच वर्षात पाणी मिळेल, असं अमित शहा म्हणाले. मराठवाड्यातील दुष्काळ दूर

करण्यासाठी 1 लाख कोटी रुपये खर्चून नदीजोड प्रकल्प सुरू असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<u>अमित शहा-मुंबई</u>**

केंद्रीय मंत्री अमित शहा आज मुंबईच्या दौऱ्यावर असून मुंबई विद्यापीठात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास आणि संशोधन केंद्राचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या 142 व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला अमित शहा यांचं विशेष व्याख्यानही आज होणार आहे. तसंच छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार प्रदान कार्यक्रमही आज होणार आहे.

**<u>निधन-बीड</u>**

बीड जिल्ह्यातल्या माजलगाव मतदारसंघाचे भाजपाचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचं काल अपघातात निधन झालं. अंबाजोगाई-लातूर महामार्गावर त्यांच्या कारला भीषण अपघात झाला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

**<u>बीड गेवराई अपघात</u>**

नुकत्याच हाती आलेल्या वृत्तानुसार, बीड गेवराई रस्त्यावर झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाल्याचं समजतं; याबाबत अधिक तपशीलाची प्रतीक्षा आहे.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल पंजाब किंग्ज इलेवन संघानं मुंबई इंडियन्सचा पराभव करत क्वालिफायर वनमध्ये स्थान मिळवलं. दोन्ही संघांसाठी महत्त्वाच्या असलेल्या सामन्यात पंजाबने मुंबई इंडियन्सची विजयी घौडदौड रोखली. मुंबई इंडियन्सने वीस षटकांत 7 गडी गमावून 184 धावा केल्या. प्रत्युत्तरा दाखल पंजाब संघाने 18 षटकं तीन चेंडूत 187 धावा केल्या.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.